# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## जाहीर सूचना

जा.सु.क्र. १ गो.वि./म.वि./ 236 /२०२० दि.13 /01 /२०२०

या सुचनेव्दारे संबंधितांना कळविण्यात येत आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ अन्वये विद्यापीठ निदेश कमांक १६/२०१९ नुसार विद्याविषयक लेखापरिक्षण पद्धतीने संलग्नित महाविद्यालयांचे संलग्निकरण चालू ठेवण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाकडून कार्यवाही घेण्यात येत असून सदर कार्यवाहीकरिता शुल्कासहीत प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. यापुर्वी परिपत्रकान्वये विद्याविषयक लेखापरिक्षणाबाबत शुल्कासहीत प्रस्ताव सादर करण्याबाबत वारंवार सुचना निर्गमित केलेल्या असून आजतागायत आपल्या महाविद्यालयाचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत. अशा महाविद्यालयालयावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२० अन्वये पुढील कार्यवाही घेण्यात येईल.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित ज्या महाविद्यालयांनी आजतागायत विद्याविषयक लेखापरिक्षणाकरिता शुल्कासह प्रस्ताव विद्यापीठात सादर केलेले नाहीत अशा महाविद्यालयांना प्रस्ताव सादर करण्यासाठी दि. २४/०१/२०२०, पर्यंत विलंब शुल्कासहीत न चुकता प्रस्ताव सादर करावे ही अंतिम संधी असून यानंतर मुदत वाढ देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी. आपणास असेही सुचित करण्यात येते की, विद्याविषयक लेखापरिक्षण न झाल्यामुळे शैक्षणिक सत्र २०२०–२१ करिता आपल्या महाविद्यालयास संलग्निकरण प्राप्त होणार नाही व प्रथम वर्षाला विद्यार्थी प्रवेशित करता येणार नाहीत, याचीही नोंद घ्यावी.

कुलसचिव
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**